MHST010011072023

दाखल तारीख : ०६.०५.२०२३
नोंदणी तारीख : २६.०५.२०२३
दाखल तारीख : २७.०७.२०२६
कालावधी : ०३ वर्षे ०२ महिना २१ दिवस

**विशेष न्यायाधीश [अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा अंतर्गत] न्यायालय, सातारा : सातारा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : स. रा. तांबोळी)

**विशेष खटला क्रमांक ७९/२०२३**

**निशाणी क्रमांकः ३३**

भाग 'अ'

प्रथम खबर अहवाल क्र. १६१/२०२३, सातारा शहर पोलीस स्टेशन, ता.सातारा, जि.सातारा

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक<br>सातारा शहर पोलीस स्टेशन,सातारा. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. ए. आर. कुलकर्णी, अतिरीक्त सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **१. मयुर शिवाजी संकपाळ,**<br>वय- २८ वर्षे, व्यवसाय- नोकरी.<br>रा. साईबाब मंदिरासमोर,<br>१/१ ब गोडोली, सातारा<br>ता.जि. सातारा.<br><br>**२. गणेश बाळासाहेब बनकर**,<br>वय- ३० वर्षे, व्यवसाय- नोकरी.<br>रा. १११ अ गोडोली, सातारा<br>ता.जि. सातारा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. एस. एस. दुदुस्कर |

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १९/०२/२०२३ |
| प्रथम खबर दाखल दिनांक | १९/०२/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ०६/०५/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०३/०२/२०२६ |
| पुरावा नोंदविण्यास सुरु केल्याचा दिनांक | १७/०३/२०२६ |
| निकाला करीता निश्चित केलेली तारीख | २७/०७/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा दिनांक (असल्यास) | निरंक |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | ठेवलेले दोषारोप | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे सुट द्यावयाचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयुर शिवाजी संपकाळ | सीआरपीसी कलम ४१(अ)१ प्रमाणे नोटीस | ०३/०२/२०२६ | भा.दं.सं. कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधीत कायदा कालम ३ (१) (आर), ३ (१) (एस), ३ (२), (व्हीए) प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| २. | गणेश बाळासाहेब बनकर | सीआरपीसी कलम ४१(अ)१ प्रमाणे नोटीस | ०३/०२/२०२६ | भा.दं.सं. कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार | निर्दोष | -- | -- |

प्रतिबंधीत कायदा कालम ३ (१) (आर), ३ (१) (एस), ३ (२), (व्हीए) प्रमाणे

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय साक्षीदार यांची यादी**

| अ.क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | अतिश आनंदा कांबळे | १९ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | संदिप संपत वनवे | २६ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | राजेंद्र संभाजी चौधरी | २९ | फिर्यादीचा जबाब नोंदविणारे म.पो.हवालदार |

**अभियोग पक्षाच्या निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | पी१/पीडब्ल्यु-१ | खबरी जबाब |
| २. | पी-२/पीडब्ल्यु-१ | जातीचा दाखला |
| ३. | पी-३/पीडब्ल्यु-१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | पी-४/पीडब्ल्यु-१ | तक्रारीतील अधोरेखांकित भाग 'अ' |

**बचाव पक्षाच्या निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | – | – |

**न्यायालयाने दिलेल्या निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | – | – |

**महत्वाच्या वस्तु (Material Object)**

| अ.क्र. | वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | – | – |

# न्यायनिर्णय

(घोषित केला दि. २७ जुलै, २०२६)

१. या प्रकरणात आरोपींच्या विरुद्ध भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हीए) अन्वये खटला चालविण्यात आलेला आहे.

२. थोडक्यात अभियोग पक्षाचे फिर्यादीप्रमाणे असे कथन आहे की, दिनांक १९/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अतिश आनंदा कांबळे, मूळ फिर्यादी, हा जरंडेश्वर नाका येथे मित्राच्या दुकानात जाण्यासाठी निघाला होता. तो साईबाबा मंदिरासमोर आला असता आरोपी मयूर संकपाळ व इतर पाच ते सहा अनोळखी व्यक्तीनीं मूळ फिर्यादीची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल क्रमांक एम.एच.११. बी.एस.७३११ अडवली व त्याला ढकलत रस्त्याच्या पलीकडे असलेल्या संतोष वडापावच्या गाडीशेजारी नेले. त्यावेळी ते त्याला म्हणाले की, “तुमच्या आर.पी.आय. लोकांना खूप मस्ती आली आहे काय? म्हारडयांनो, तुमची लायकी तरी आहे काय? तुमच्या फॅमिलीला व तुला गोडोलीमध्ये राहू देणार नाही. तू आमच्याबद्दल तलाठ्याला तक्रार करतोस, आमच्याशी नडतोस, तुला जिवे मारून टाकतो.” अशी धमकी देऊन तसेच जातीवाचक शिवीगाळ करून आरोपी मयूर संकपाळ व इतर पाच ते सहा जणांनी त्याला मारहाण केली. म्हणून त्याने पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

३. तक्रारीच्या आधारे आरोपींच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १६१/२०२३ दाखल करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकाऱ्यांने घटनास्थळाचा पंचनामा केला, मूळ फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सबळ पुरावा मिळाल्यानंतर आरोपींच्या विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. हे प्रकरण या न्यायालयात आल्यानंतर या न्यायालयाने आरोपींच्या विरुद्ध निशाणी १० खाली भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह

कलम ३४ तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हीए) प्रमाणे दोषारोप ठेवला. दोषारोपातील तपशील आरोपींना मराठी भाषेत समजावून सांगण्यात आला. आरोपींनी गुन्हा केल्याचे नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. मी अभियोग पक्षाचे विद्वान अतिरिक्त सरकारी वकील श्री. ए. आर. कुलकर्णी तसेच आरोपींचे विद्वान वकील श्री. एस. एस. दुदुस्कर यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी केलेल्या युक्तिवादावरून मी खालील मुद्दे विचारात घेतलेले आहेत. त्या मुद्द्यांवरील निष्कर्ष व त्यांची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| २. | आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३४१ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ३. | आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ४. | आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ५. | आरोपींनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ चे कलम ३(१)(आर) प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ६. | आरोपींनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(एस) प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने | |

सिद्ध केले आहे काय? ... नकारार्थी

७. आरोपींनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ चे कलम ३(२)(व्हीअे) प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? ... नकारार्थी

८. काय आदेश ? ...अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमीमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ७-**

६. अतिश कांबळे (पी.डब्ल्यु-१) हा महत्त्वपूर्ण साक्षीदार आहे. त्याने साक्ष दिली की, दिनांक १९/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तो त्याच्या मोटारसायकलने साईबाबा मंदिरासमोरून जात होता. त्यावेळी त्याने त्याची गाडी थांबवली. त्या वेळी चार-पाच अनोळखी लोक तेथे आले. त्या लोकांनी त्याचा मोबाईल हिसकावून घेतला व त्याला ओढत संतोष वडापावच्या गाडीपर्यंत नेले. त्यांनी त्याला शिवीगाळ केली. पोलिसांनी त्याचा पुरवणी जबाब नोंदविला. त्याने पोलिसांना त्याचे जातीचे प्रमाणपत्र (निशाणी पी२/पीडब्ल्यु-१) दिले. त्याचबरोबर त्याने पोलिसांना घटनास्थळ दाखवले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा (निशाणी पी३/पीडब्ल्यु-१) केला.

७. त्याने सांगितले की, त्याने संकपाळ व इतर अनोळखी व्यक्तींची नावे सांगितली होती; परंतु न्यायालयासमोर हजर असलेले आरोपी घटनेच्या वेळी उपस्थित होते की नाही, हे त्याला सांगता येत नाही. त्याने निशाणी पी१/पीडब्ल्यु-१ तक्रार स्वतः दिल्याचे सांगितले आहे; मात्र आरोपींना ओळखण्यास नकार दिला आहे.

८. त्यामुळे अभियोग पक्षाने या साक्षीदाराची उलटतपासणी घेतली. त्यावेळी त्याने नाकारले की आरोपी क्रमांक १ व २ यांनी त्याचा रस्ता अडवला व त्याला जातीवाचक शिवीगाळ केली. त्याने त्याच्या तक्रारीतील व पुरवणी जबाबातील मजकूर खरा असल्याचे सांगितले.

९. तथापि, आरोपींच्या वतीने उलटतपासणी घेतली असता त्याने सांगितले की, त्याने ऐकीव माहितीच्या आधारे आरोपी क्रमांक १ चे नाव घेतले होते. आरोपी क्रमांक १ व २ यांचा घटनेशी संबंध नाही. त्यांनी त्याला शिवीगाळ केलेली नाही. त्यामुळे या साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षाचे कथन सिद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरत नाही.

१०. अभियोग पक्षाने संदीप (पीडब्ल्यु-२) याची तपासणी केली आहे. तो गोडोली गावामध्ये तलाठी या पदावर कार्यरत होता. त्याने सांगितले की पीडब्ल्यु-१ ने त्याला फोन करून कळविले होते की साईबाबा मंदिरासमोर बांधकामासाठी खड्डे काढण्याचे काम सुरू आहे व त्याचे फोटो व्हॉट्सअॅपवर पाठविले होते. म्हणून तो त्या ठिकाणी गेला. संकपाळ हा त्या जागेचा मालक होता. त्याच्याकडे परवानगीबाबत विचारणा केली; परंतु त्याच्याकडे परवानगीची कागदपत्रे नव्हती. म्हणून त्याने त्या ठिकाणी पंचनामा करून त्याचा अहवाल तहसील कार्यालयाकडे पाठविला. आठ दिवसांनंतर त्याला पीडब्ल्यु-१ चा फोन आला. त्याने फोनवरून सांगितले की, त्याला मारहाण झाली आहे. या साक्षीदाराने आरोपींच्या विरुद्ध कोणतेही ठोस कथन केलेले नाही. त्यामुळे या साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षाचे कथन सिद्ध करण्यासाठी उपयुक्त नाही.

११. राजेंद्र (पीडब्ल्यु-३) हा सातारा शहर पोलीस ठाण्यात कार्यरत होता. त्याने सांगितले की त्याने पीडब्ल्यु-१ ची तक्रार नोंदविली. मात्र त्याने अभियोग पक्षाच्या कथनाला कोणतीही पुष्टी दिलेली नाही.

१२. घटना पाहणारा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. मुळात पीडब्ल्यु-१ हाच आरोपींवरील गुन्ह्याबाबत काही बोलत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपींवरील भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधीत कायदा कालम ३ (१) (आर), ३ (१) (एस), ३ (२), (व्हीए) प्रमाणे गुन्हे संशयाच्या पलीकडे सिद्ध केलेले नाहीत. अभियोग पक्ष आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध करण्यास असमर्थ

ठरलेला आहे. त्यामुळे मी मुद्दे क्रमांक १ ते ६ यांची उत्तरे “गुन्हा सिद्ध झाला नाही” अशी देत आहे व खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ मयुर शिवाजी संकपाळ, नं.२ गणेश बाळासाहेब बनकर यांना भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधीत कायदा कालम ३ (१) (आर), ३ (१) (एस), ३ (२), (व्हीए) अन्वयेच्या आरोपातून भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम २५८ (१) अंतर्गत निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींनी दिलेला वैयक्तिक जात मुचलका व जामीन बंधपत्र रद्द करण्यात आलेले आहेत.

३. भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपींनी वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी वैयक्तिक जात मुचलका व ऐपतदार जामीन बंधपत्र रक्कम रु.१५,०००/- दयावे.

SARDAR RAJEKHAN TAMBOLI
Digitally signed by SARDAR RAJEKHAN TAMBOLI
Date: 2026.07.27 18:02:48 +0530

ठिकाण : सातारा.
दि. २७.०७.२०२६

(स.रा.तांबोळी)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश व
विशेष न्यायाधीश [अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा अंतर्गत] न्यायालय,
सातारा